# लोककला  अकादमीतर्फे चित्रकथी कार्यशाळा

मुंबई विद्यापीठाचे शाहिर अमरशेख अध्यासन, लोककला अकादमी, भारत सरकारचे पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र आणि पिंगुळी ता. कुडाळ येथील विश्राम ठाकर चॅरिटेबल ट्रस्ट कला अंगण यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१९ ते २८ जुलै या कालावधीत पिंगुळी येथे चित्रकथी तसेच बोलक्या बाहुल्यांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचे उद्‌घाटन लोककला अकादमीचे विभागप्रमुख प्रा.डॉ.प्रकाश खांडगे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र चे कार्यक्रम अधिकारी राकेश मेहता, प्रख्यात चित्रकथी कलावंत परशुराम गंगावणे उपस्थित होते. या कार्यशाळेत एकूण ३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला असून पर्यटनाचे आकर्षण असणाऱ्या पिंगुळी येथील गंगावणे यांच्या कला अंगणात सुरू असलेल्या या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी प्रख्यात बोलक्या बाहुल्या तज्ज्ञ मीना नाईक, दशावताराचे अभ्यासक डॉ.तुलसी बेहरे, गोवा कला अकादमीचे माजी सचिव आणि प्रख्यात लोकसाहित्य अभ्यासक श्री. विनायक खेडेकर, लोककला अकादमीचे सहाय्यक प्रा.डॉ.गणेश चंदनशिवे, प्रा. मोनिका ठक्कर यांना व्याख्यानासाठी निमंत्रीत करण्यात आले होते.

चित्रकथी ही कालौघात नष्ट होऊ शकणारी लोककला असून तरूण पिढीत व शालेय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये चित्रकथी परंपरा, बोलक्या बाहुल्यांची परंपरा या विषयी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी ही कार्यशाळा असल्याचे डॉ.खांडगे यांनी स्पष्ट केले. या कार्यशाळेला पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्राचे संचालक फुरकान खान आणि कार्यक्रम अधिकारी डॉ. लईक हुसेन यांचे मार्गदर्शन लाभले आहे.